अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ईमेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. ११/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ २८७० दि. १८/०७/१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/११/२०१९

डॉ. सुमेध विनायक अनथपिंडीका
ए१/४०२ बेलेझा ब्ल्यू, मांजरी रोर्ड,
केशवनगर, मुंढवा
पुणे ४११०२८ ----------- अपिलार्थी

विरुद्ध

१) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे मनपा
२) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक
उप आयुक्त (विशेष) कार्यालय, पुणे मनपा
३) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
(माहिती व तंत्रज्ञान) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कोर्पो लि.
४) जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता भवन रचना कार्यालय, पुणे मनपा

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

डॉ. सुमेध विनायक अनथपिंडीका, ए१/४०२ बेलेझा ब्ल्यू, मांजरी रोड, केशवनगर, मुंढवा, पुणे ४११०३६ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, मा. महापलिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. २३.०५.२०१९ रोजी अर्ज करून "एम.सी.ओ./भवन/६०९५ दि. १८.०१.२०१७ तुसार सह आयुक्त श्री विलास कानडे यांच्या लीडरशिप खाली "Review & Implimentation Committee" स्थापन केलेली होती. त्या बाबत एकूण २ मुद्द्यावर माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी मा. महापलिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. १८०३ दि. २४.०५.२०१९ अन्वये सदरचा अर्ज मा. जन माहिती अधिकारी, उप आयुक्त (विशेष) कार्यालय, व मा. जन माहिती अधिकारी (पी.एस.सी.डी.सी.एल.) कार्यालय यांना वर्ग केलेला आहे व अर्जदारास तसे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, उप आयुक्त (विशेष) कार्यालय, पुणे मनपा यांनी जा. क्र. उआवि/९८ दि. ०३.०६.२०१९ अन्वये सदरचा अर्ज मा. अधीक्षक अभियंता भवन रचना विभाग, पुणे मनपा व मा. जन माहिती अधिकारी (पी.एस.सी.डी.सी.एल.) कार्यालय यांचेकडे वर्ग केलेला आहे. व अर्जदारास तसे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ट अभियंता (माहिती व तंत्रज्ञान) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कोर्पो. लि. यांनी दि. १५.०६.२०१९ रोजी "अर्जदार श्री डॉ. सुमेध विनायक अनथपिंडीका, ए१/४०२ बेलेझा ब्ल्यू, मांजरी रोड, केशवनगर, मुंढवा, पुणे ४११०३६ यांचे अर्जातील "रिव्हयू अँड इम्प्लीमेंटेशन" कमिटी चा उल्लेख आहे. सदर कमिटी पुणे मनपा स्तरावर स्थापन झाली असावी" असे नमूद करून सदरचा अर्ज पुन्हा जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक उप आयुक्त (विशेष) कार्यालय, पुणे मनपा यांचेकडे पाठविला आहे. व तसे अर्जदारास तसे कळविले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २३.०५.२०१९ | २३.०५.२०१९ | २२.०६.२०१९ | २४.०५.२०१९ (महापलिका आयुक्त कार्यालय) ०३.०६.२०१९ (उप आयुक्त विशेष कार्यालय) १५.०६.२०१९ (पुणे स्मार्ट सिटी डेव्ह.कॉर्पो. लि. | ०० |

अपिलार्थी यांना वरील तिन्ही कार्यालयाकडून माहिती न मिळाल्याने अपिलार्थी यांनी प्रथम अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. २१.०६.२०१९ रोजी प्रथम अपील क्र. ११/२०१९ दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २१.०६.२०१९ | २१.०६.२०१९ | २३.०६.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. १०.०७.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी डॉ. सुमेध विनायक अनथपिंडीका, ए१/४०२ बेलेझा ब्ल्यू, मांजरी रोड, केशवनगर, मुंढवा, पुणे ४११०३६ हे उपस्थित होते. तसेच श्री दयानंद सोनकांबळे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी मा. महापलिका आयुक्त कार्यालय पुणे मनपा, श्रीमती नीता सोनार जन महिती अधिकारी तथा अधीक्षक, उप आयुक्त (विशेष) पुणे मनपा व जन माहिती अधिकारी पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पो. लि. यांचे प्रतिनिधी श्रीमती मयुरी पोतदार हुद्दा ज्युनीअर क्लार्क, आणि श्री गढई समीर प्रतिनिधी अधीक्षक अभियंता (भवन रचना) कार्यालय पुणे मनपा हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी **डॉ. सुमेध विनायक अनथपिंडीका**, ए१/४०२ बेलेझा ब्ल्यू, मांजरी रोड, केशवनगर, मुंढवा, पुणे ४११०३६ यांनी कोणत्याही कार्यालाकडून माहिती मिळाली नाही असे प्रतिपादन केले तर श्री दयानंद सोनकांबळे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी मा. महापलिका आयुक्त कार्यालय पुणे मनपा यांनी जा. क्र. १८०३ दि. २४.०५.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिले आहे असे प्रतिपादन केले. नीता सोनार जन महिती अधिकारी तथा अधीक्षक, उप आयुक्त (विशेष) पुणे मनपा यांनी जा. क्र. उआवि/९८ दि. ०३.०६.२०१९ ने उत्तर दिले आहे असे प्रतिपादन केले. परंतु अपिलार्थी यांना कोणत्याही कार्यालयाकडून माहिती मिळाली नसल्याचे दिसून येते.

## आदेश

अपिलार्थी **डॉ. सुमेध विनायक अनथपिंडीका**, ए१/४०२ बेलेझा ब्ल्यू, मांजरी रोड, केशवनगर, मुंढवा, पुणे ४११०३६ यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक मा. उप आयुक्त (विशेष) कार्यालय, प्रशासन अधिकारी तथा जन माहिती अधिकारी मा. महापलिका आयुक्त कार्यालय, जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी अधीक्षक अभियंता भवन रचना कार्यालय, आणि जन माहिती अधिकारी पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पो. लि. यांनी अपिलार्थी यांचे अर्जातील आपापले कार्यालयातील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. सबब अपील क्र. ११/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका